फेब्रुवारी २०२५

स्वअध्ययनातून भविष्यवेधी शिक्षणाकडे...

# ‘वेध सृजन’




अंक क्र.
2

वेध परिवार, भारत

प्रेरणास्थान तथा
मार्गदर्शक :- श्री. नंदकुमार साहेब, महासंचालक मिशन मनरेगा,

संपादक :- श्री. निलेश घुगे, (मनरेगा,ओ.बी.सी.,एम.पी.एस.पी.मुंबई )

कार्यकारी संपादक :- श्री. प्रभाकर हिप्परगे, (केंद्र प्रमुख, लातूर )

संपादन सल्लागार :- रोहिणी विद्यासागर (प्राथमिक शिक्षिका)
जि. प. कें. प्रा. शाळा कुंभेफळ ता. जि. छ. संभाजीनगर

:- अशोक निकाळजे ( सहशिक्षक )
जि. प. उच्च प्राथ. शाळा आगरनांदुर. ता. गेवराई. जि. बीड .

संपादन सचिव :- प्रियंका पाटील (राज्य प्रशिक्षण कक्ष, इ.मा.ब.क.मंत्रालय मुंबई

संपादन सहाय्य :- अनिता राठोड -सहशिक्षिका
कै.गुरुदयालसिंग राठोड माध्यमिक आश्रमशाळा गराडा,
ता.कन्नड,जि.छत्रपती संभाजीनगर.

:- हर्षदा चोपणे (सहशिक्षिका)
जि. प. शाळा सिंधीवाढोणा ता- (झरी जामनी) जिल्हा यवतमाळ

:- गजाजन तुरारे (पदवीधर विषय शिक्षक)
जि. प. उच्च प्राथ.शाळा रांगणा.ता. वणी, जिल्हा यवतमाळ.

:- नितीन मेमाणे ( पदवीधर शिक्षक)
जि. प. प्राथ. शाळा पांडे, तालुका:- भोर, जिल्हा:-पुणे

:- ललित उदापुरे (वेध स्त्रोत, क्षमता बांधणी कक्ष, वाशीम )

:- दिपेश पुरोहित (शिक्षक )
शास.पूर्व मा. विद्यालय बोरसी , ता. डभरा जि. सक्ति,
छत्तीसगढ़

# वेधसृजन अंक पार्श्वभूमी ...

**प्रिय वाचक,**

गेल्या चार वर्षांपासून वेध हा समूह राज्य तसेच देशपातळीवर शिक्षणाचा प्रचार प्रसार करत परिणामककारक अध्ययन अध्यापन पद्धतीच्या वाटा धुंडाळत आहे. हे करत असतांना नेमके मूल शिकते करण्याचे मार्ग कोणते आहेत? शिक्षकांनी/ पालकांनी कोणते मार्ग अवलंबन करत मूल शिकते करायचे आहे? शिक्षकांनी शिकवायचे की मूले स्वतः शिकतील यासाठी योजना आखायच्या? या आणि अशा अगणित प्रश्नांच्या मुळाशी जाऊन ठोस असे धोरण वेधला मिळालंय. ते म्हणजे मुलांना शिकवायचे नाही तर ते स्वतः शिकतील याचे नियोजन  व्यवस्थापन आणि नेतृत्व करायचे. "शिकायचे कसे हे शिकणे" हा वेध विचारांचा गाभा आहे आणि हा विचार आता वैश्विक होत जात आहे. या वैश्विकीकरणाच्या प्रवासात वेध परिवाराचे सर्वेसर्वा वेध चे प्रेरणास्त्रोत महाराष्ट्र राज्याचे माजी शिक्षणसचिव आणि सध्याचे मिशन महासंचालक (मनरेगा) आदरणीय नंदकुमार सर यांच्यासोबत वेध चे संघटक श्री. निलेश घुगे आणि त्यांची संपूर्ण टीम शिक्षण क्षेत्रात सातत्याने चार वर्षापासून सक्रीय योगदान देत स्वयंचलित अध्ययन प्रणालीचा प्रचार प्रसार आणि जागरूकता निर्माण करत आहेत. आज महाराष्ट्र राज्य आणि राज्याबाहेरील अनेक शिक्षणप्रेमी वेधसोबत जोडले गेले आहेत. वर्ष २०२३ मध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र (SCERT) च्या माध्यमातून वेध समूहाने संशोधित केलेले प्रशिक्षण मॉड्यूल "अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन" हे राज्यातील प्रत्येक शिक्षकापर्यंत पोचलेले आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून भविष्यवेधी शिक्षण प्रणाली च्या स्वः पातळीवर करावयाच्या ६ पायऱ्या स्विकारत मुलांना गतीने शिकण्यास प्रेरित करणारी एक साखळी तयार झालेली आहे. मुलांना शिकवायचे कसे हा प्रश्न आता संपलेला आहे आणि एक शाश्वत मार्ग राज्याचा शिक्षण विभागाला मिळालेला आहे. हे सर्व चित्र अत्यंत समाधानकारक आहे आणि आता हे समाधान फक्त वेध समूहापुरते किंवा या प्रक्रियेवर काम करणाऱ्या शिक्षकांपर्यंत सिमीत रहावे असे होऊ नये यासाठी तसेच तळगाळातील शिक्षकांना वैश्विक स्विकृती मिळवून देणे, त्यांच्या कामाचा प्रसार करणे, त्यांच्याकडून प्रेरणा घेत समविचारी स्वयंप्रेरित शिक्षकांची चळवळ उभी करणे यासाठी "वेध सृजन" हे अंक निर्मिती चा निर्णय घेतला आहे.

या अंकाच्या वैशिष्ट्यपूर्ण बाबी खालीलप्रमाणे असणार आहेत.

भविष्यवेधी शिक्षण पध्दतीच्या ६ पायऱ्या उपयोगात आणुन परिणाम मिळवणाऱ्या शिक्षकांचे अनुभव अंकाच्या माध्यमातून छापणे आणि प्रसारित करणे.

मूल शिकण्याच्या स्वयंचलीत पध्दतींचा प्रचार प्रसार करणे.

साध्या सोप्या भाषेत परिणामकारक अनुभवांची मांडणी करत इतर शिक्षकांना प्रेरित करणे.

वेधसृजन अंकाच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या घटकांना लेखक होण्यासाठी त्यांचे विचार मांडण्यासाठी हक्काचे व्यासपिठ मिळवून देणे.

लिहिते होण्यासाठी संधीची समानता उपलब्ध करून देणे.

केवळ शिक्षक च नव्हे तर पालक, शालेय विद्यार्थी यांच्यात लेखन प्रेरणा जागृत करणे.

विद्यार्थी, पालक, शिक्षणप्रेमी यांना त्यांचे विचार अनुभव लेखनाची संधी देणे.

राज्य, राज्याबाहेरील शैक्षणिक अनुभवांचे लेखन करणाऱ्या लेखकांना जोडणे आणि लिखित स्वरूपातील अनुभवांची देवाणघेवाण करणे.

लेखन संस्कृती रुजवणे.

अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण बाबींचा ध्यास घेत "वेध सृजन" अंक आपणा सर्वांच्या सेवेसाठी तसेच सहयोग आणि सहकार्याने उपलब्ध होत आहे याचा विशेष आनंद होत आहे.

वाचक या अभिनव अंकातील प्रेरक लिखित अनुभवांचा उपयोग आपल्या शैक्षणिक कार्यक्षेत्रत उपयोग करतील आणि मुलांच्या शिकण्यात योगदान देतील असा विश्वास वाटतो.

वेधसृजन अंक शिक्षण क्षेत्रात अतुलनिय योगदानाच्या पातळीवर काम करेल या विश्वासासह आपणा सर्वांना शुभेच्छा! आणि लिहिते होण्यास्तव आग्रह 🙏🏻

**धन्यवाद !**

**सचिव**
**वेधसृजन अंक**

# शुभेच्छा संदेश



**नंदकुमार**
**मिशन महासंचालक (मनरेगा)**

जगातील मुलांना शिकते करण्यासाठी वेध PLC मागील अनेक वर्षांपासून अतिशय उत्तमरित्या काम करत आहे. मला वाटते जगातील ही एकमेव PLC असेल जी दररोज रात्री zoom च्या माध्यमातून एकत्र येऊन मुलांच्या शिकण्याबाबत चर्चा, विचारविनिमय आणि शैक्षणिक धोरण आखते. मी शिक्षण सचिव असताना राज्यातील अनेक शिक्षकांच्या संपर्कात आलो. त्यातील काही शिक्षक आजही सोबत आहेत आणि मला सांगतांना आनंद वाटतो की,मी सुद्धा त्यांच्यासोबत वेधवर्क टीमच्या चर्चेत सहभागी होत असतो. माझा या सर्वांसोबत शिकण्याचा प्रवास अविरतपणे सुरू आहे. विविध विभागांच्या महत्वपूर्ण पदांवर माझी नियुक्ती असतांना मी शिक्षणासाठी, शिक्षकांसाठी कसे काय वेळ काढू शकतो? असा प्रश्न मला अनेकजण विचारतात. जगातील प्रत्येक मूल शिकण्याच्या प्रक्रियेत माझे स्वतःचे योगदान देता यावे या उदात्त हेतूने मी हे सगळं अथकपणे करतोय आणि करत राहणार आहे. वेधचा प्रवास मागे वळून पाहता एक सहज एकमेकांची भेट व्हावी, शैक्षणिक गप्पा व्हाव्यात या अनुषंगाने सुरू केलेला हा समूह आज एका यशस्वी PLC च्या रूपात राज्य आणि राज्याबाहेर सुद्धा काम करत आहे. प्रशिक्षण क्षेत्रातील वेध चे योगदान अमूल्य आहे. अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून वेधची विचारशैली आणि कार्यपध्दती राज्याच्या प्रत्येक शिक्षकापर्यंत पोहचविणे हे वेधचे सर्वात मोठे यश म्हणावे लागेल आणि याचीच फलश्रुती म्हणजे राज्यातील अनेक शिक्षक भविष्यवेधी शिक्षण प्रक्रियेच्या ६ पायऱ्यांचा उपयोग करत मुलांना शिकते करत आहे. या शिक्षकांचे अनुभव अत्यंत प्रेरणादायी आहेत आणि हे प्रेरणादायी अनुभव आता स्वतंत्र "वेध सृजन" या अंकाच्या माध्यमातून लिखित स्वरूपात उपलब्ध होत आहेत. निलेश घुगे संपादक म्हणून जबाबदारी सांभाळणार असुन प्रियंका अहिरराव, प्रभाकर हिप्परगे, रोहीणी विद्यासागर, अशोक निकाळजे आणि त्यांची संपूर्ण टीम या अंकासाठी जबाबदारी घेत आहेत. वेधसमूहाने घेतलेला हा निर्णय अतिशय कौतुकास्पद आहे. या निमित्ताने वेधस्त्रोत यांनी सर्वप्रथम लिहिते व्हावे आपले जास्तीत जास्त अनुभव लिखित स्वरूपात मांडावेत, रात्रीच्या चर्चेत गप्पाच्या माध्यमातून इतरांचे अनुभव ऐकावेत ते जाणकारांनी पुस्तकाच्या भाषेत लिहून काढावेत. जिल्हा गटातील सदस्यांना लिहिण्यासाठी प्रोत्साहित करावे. हे सर्व करत असतांना एक बाब विचाराधीन असावी ती म्हणजे आपण मांडत असणारे विचार भविष्यातील मूल घडवण्यासाठी प्रेरक असावेत आणि ते अनुभव वाचून सर्वसामान्य शिक्षकाला प्रेरणा मिळावी. तुमच्या लेखनातून Learning to learn हे तत्व रुजावे. शिक्षकांना वर्गपातळीवर भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यास मदत व्हावी. लेखन परिणामाधारित असावे. या अपेक्षांसह मी "वेध सृजन" या अंकासाठी शुभेच्छा देतो.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | सकारात्मक शाळा भेट | रोहीणी पिंपरखेडकर | ०१ |
| 2 | आज आनंदी आनंद झाला | अनिता राठोड | ०४ |
| 3 | वेधची गाडी, गौरीला तारी | सुरेश बाहेकर | ०६ |
| 4 | स्वत: शिकण्यातील मज्जाच वेगळी | बळीराम मुरमे | ०८ |
| 5 | वेध परीवार | | १० |
| 6 | जादू आव्हानाची,वाढली गती स्वत: शिकण्याची | नेहा गोखरे | १२ |
| 7 | Learning Intervention ची साथ, गणिताच्या भितीवर मात | ज्योती खरात | १५ |
| 8 | वारे,भविष्यवेधी शिक्षण विचारांचे | सोनाली पाटील | १६ |
| 9 | अंक क्र.१ वाचक अभिप्राय | स्वाती खुडे | १८ |
| 10 | वेधकृतीची कमाल,आनंदी बालगोपाल | अमिता राऊत | २० |
| 11 | असे फिरावे शाळेमध्ये आव्हानाचे लावूनी अत्तर | शितल मदने | २२ |
| 12 | वेध पब्लिकेशन- वाचक अभिप्राय | | २४ |
| 13 | निसर्गाची ओढ,त्याला पर्यावरणपूरक उपक्रमाची जोड | विद्या माळी | २६ |
| 14 | Future Vidya- माहिती | | २९ |
| 15 | काव्यसंग्रह | | ३१ |

# सकारात्मक शाळा भेट



• रोहिणी पिंपरखेडकर विद्यासागर

दिनांक 16 ऑगस्ट 2024 रोजी करमाड बीट च्या आदरणीय शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती कल्पना पदकोंडे यांनी माझ्या वर्गाला भेट दिली. शाळेत आल्यानंतर त्या माझ्या वर्गात येतील असं मला अजिबात वाटलं नव्हतं. मात्र अचानक त्या वर्गात आल्या. मुलांनी त्यांना अभिवादन केल्यानंतर तितक्याच गोड आवाजात त्यांनी मुलांना प्रतिसाद दिला आणि मला विचारले, मॅडम वर्गात काय चालू आहे ?

मी उत्तर दिले की मुलांचे शिकणे सुरू आहे आणि विशेष म्हणजे मुले स्वतःच शिकत आहेत.



शिक्षण विस्तार अधिकारी पदकोंडे मॅडम, मुलांशी चर्चा करतांना,

मग त्यांनी मुलांनाच प्रश्न विचारायला सुरुवात केली.

तुम्ही सकाळपासून कोणकोणते विषय शिकलात ?

असे विचारताच भाग्यश्री उठून उभी राहिली आणि ती म्हणाली, "मॅडम आम्ही सकाळी मराठीचे शब्द शिकलो."

तुम्हाला मराठीचे शब्द कोणी शिकवले? मुलांनी तनुक्षाचे नाव सांगितले. मग तनुक्षा उठून उभी राहिली आणि मी मुलांना समानार्थी विरुद्धार्थी शब्द शिकवले अशी माहिती तिने दिली. आता तुमचे काय सुरू आहे? असा प्रश्न विचारताच, "मॅडम,आम्ही आता इंग्रजीचे शब्द लिहीत आहोत आणि त्यानंतर गणित करणार आहोत असे उत्तरही त्यांनी परस्परच देऊन टाकले.

तुम्ही मुलांना लेखी नियोजन दिले आहे का की मुले स्वतःच मनाने करत आहेत असे मॅडम यांनी मला विचारले. पण मुलांनी स्वतःच ठरवले आहे मी त्यांना कोणते नियोजन दिले नव्हते. मुख्यमंत्री सुंदर शाळा या विषयावरती काम करत असल्यामुळे मी ऑफिसमध्येच होते ही माहिती मी त्यांना दिली.

तसेच वर्गातील विविध विद्यार्थ्यांच्या क्षमता, कोण कोणत्या गोष्टीत पारंगत आहेत? कोणत्या क्षेत्राकडे त्यांचा कल आहे? कोणत्या बाबतीमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतात इत्यादी बद्दलची माहिती मी मॅडमला दिली.

मुले घटकावर स्वतः प्रश्न निर्मिती करतात. स्वतः संख्या तयार करतात, संख्या विस्तार करतात, संख्या मधील अंकांची स्थानिक किंमत सांगतात, दोन पेक्षा अधिक संख्या घेऊन बेरीज करतात, संख्यातील लहान मोठेपणा ओळखतात हे त्यांना सांगितले. मी ज्या ज्या घटकाबद्दल माहिती देत होते त्याबद्दल मुलांनी स्वतः केलेले काम मुले उस्फूर्तपणे मॅडम समोर घेऊन येत होती आणि न घाबरता त्यांना माहिती देत होती. त्यांनी काढलेली विविध चित्रे केलेली कलाकुसर दाखवत होती. परस बागेत



**मुलांनी शिकवलेल्या गोष्टी मुलंच तपासतात.**

आपण कोण कोणत्या गोष्टी लावू शकतो या प्रश्नावर देखील त्यांनी चांगली उत्तरे दिली. शिक्षकांवर, वर्गातील मित्र मैत्रिणींवर लिहिलेले निबंध देखील त्यांनी मॅडमला दाखवले. शतक माळेवर संख्या ओळखल्या.

अनुष, योगीराज, अर्पिता, तनुक्षा, भक्ती, तन्वी, भाग्यश्री, रूपाली, रमाकांत, सुरज, माहिरा, रुद्र, श्रेया अशा सर्वच मुलांनी मॅडमला मी स्वतः काय शिकलो हे दाखवण्यासाठी गर्दी केली मात्र इतक्या मुलांना एकाच वेळी अटेंड करणे शक्य होत नसल्यामुळे त्यांनी मुलांना खाली बसायला सांगितले. तेव्हा मुले नाराज झाली पण मी पुन्हा तुमच्या वर्गाला भेट द्यायला नक्की येईल असा शब्द मॅडमनी मुलांना दिला.त्यानंतर वर्गातील नीता नीमरट या विद्यार्थिनीला चित्र वर्णन खूप छान करता येते ही माहिती मी त्यांना दिली. मॅडम तिला म्हणाल्या वर्गात लावलेल्या शिवराज्याभिषेकाच्या चित्राचे वर्णन कर. तिला त्याबद्दल बोलता आले नाही. म्हणून ती शांत बसली.

पण मी तिला काय चांगले करता येते हे सगळ्या वर्गासमोर सांगितल्यामुळे नीता खूपच खुश झाली होती आणि मॅडम वर्गा बाहेर गेल्यानंतर ती माझ्यामागे पुस्तक घेऊन फिरू लागली आणि मला म्हणाली, " त्या मॅडम परत आल्या ना की मी त्यांना या चित्राबद्दल सांगेल. तोपर्यंत तुम्हाला पुस्तकाची माहिती सांगू का? असे विचारले आणि मी हो म्हणताच हातात मिळेल ते पुस्तक घेऊन त्याबद्दल अतिशय आत्मविश्वासाने सांगायला सुरुवात केली.

तिचा आनंद उत्साह पाहून भक्ती तिला म्हणाली, " "त्या मॅडम आल्या तेव्हा का बरं गप्प बसली होती? तुला तर किती छान सांगता येते! आता इथून पुढे घाबरू नको. कोणी आलं आणि तुला विचारलं तर सांगत जा!!"

त्यानंतर मुले मला वेगवेगळ्या विषयावरती बोलू लागली. अधिकारी मॅडम आपल्या वर्गात येऊन गेल्या आणि त्यांनी आपले कौतुक केले याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

भक्ती म्हणाली, " मॅडम आम्ही फक्त तुम्ही असल्या की खूप बडबड करतो, खूप बोलतो, आम्हाला जे करायचं असतं ते करतो. पण बाहेरचं कुणी आलं की आम्ही त्यांना शिस्तीत माहिती देतो बरं का!"

मुलं एटीकेट्स,मॅनर्स शिकत आहेत हे पाहून मला फार छान वाटले.

मग माझ्याजवळ येऊन गप्पा मारण्यास आतुर झालेल्या मुलांना तिने परस्पर सूचना दिली, " आपण इतका वेळ छान बसलेलो होतो ना! त्या मॅडम परत आपल्या वर्गात आल्या आणि आपण असे उभे दिसलो तर त्या आपल्याला काय म्हणतील . त्यामुळे तुम्ही व्यवस्थित जागेवर बसून अभ्यास करा!"

जेवणाच्या सुट्टीनंतर मी वर्गात गेली तर तेव्हा सुद्धा मुले वेगवेगळ्या विषयाचा अभ्यास करत बसली होती. श्रेया, तनुक्षा आणि भक्ती यांनी माझा मोबाईल घेऊन ड्यूलिंगो ॲप वर स्पोकन इंग्लिश शिकायला सुरुवात केली होती.

मी जवळ जाऊन बसल्यावर मुली मला म्हणाल्या की, मॅडम शिकणं खूप सोपं आहे. एकदा आपण सुरू केलं की थांबायची गरज नाही. आपण आपोआप पुढे पुढे जात राहतो.



पियर लर्निंग

मुलं खरोखरच किती पुढे गेली आहेत हे पाहून मला मनस्वी समाधान वाटले.

**रोहिणी पिंपरखेडकर विद्यासागर**

**जि.प.प्राथमिक केंद्र शाळा कुंभेफळ,ता.जि.संभाजी नगर**

# आज आनंदी आनंद झाला



• अनिता मगन चव्हाण-राठोड

**नमस्कार !**

माझा हा आनंद आहे माझी मुले सृजनशील बनत असल्याचा. माझा हा आनंद आहे माझी मुले स्वतः शिकती झाल्याचा.मित्रांनो, शिक्षक म्हणून काम करीत असताना आपल्याला एक दुःख असते ते म्हणजे बेंबीच्या देठापासून ओरडून शिकवूनही काही शिकतात तर काही शिकत नाहीत . हे आपल्या दुःखाचे कारण असते. नुसताच 'आरडा ओरडा नी घसा कोरडा' होतो आणि परिणाम मात्र शून्य.

असे सर्व अनुभव मलाही येत असतानाच भविष्यवेधी शिक्षण विचारांची ओळख मला झाली व केवळ माझा दृष्टिकोनच बदलला असे नाही, तर माझ्या स्वतःमध्येही अमूलाग्र बदल झाले.

भविष्यवेधी शिक्षणाच्या सहा पाय-या

**1)मुलांना स्वतः शिकण्यस प्रेरीत करणे.**
**2)मुलांना शिकण्यात आव्हान देणे.**
**3)learning intervention.**
**4)Selfie with success.**
**5)शिकण्यात तंत्रज्ञानाचा वापर**
**6)जिज्ञासा वृत्तीचा सन्मान.**

या अत्यंत उपयुक्त ठरत आहेत आणि माझ्या आनंदात दिवसेंदिवस भरच पडत आहे. मुलांना स्वयंप्रेरित करण्यासाठी मी आव्हान फळा हा उपक्रम सुरु केलेला आहे.यामुळे सर्वच वर्गातील मुले फळ्यावरील आव्हाने पाहतात व पूर्ण करुन आणतात. आव्हान पूर्ण झाल्यानंतर मुलांची माझ्या कडे येऊन सेल्फी घेण्याची चढाओढ मला जो आनंद देऊन जाते ,तो केवळ शब्दातीतच. हा आनंद द्विगुणित करणारी घटना दि.9 जानेवारी,2025 ला सातवीच्या वर्गात घडली.एक दिवसापूर्वी मी पाठाशी संबंधित एक आव्हान दिले. आई विषयावर कविता कोण लिहीते .



Selfie With Success

दुस-या दिवशी वर्गात प्रवेश करताच सर्वांनी गलका केला.मॅडमा कविताssssमॅडम कविताssss.चंचल,समृद्धि,आराध्या,कामिनी,नंदिनी.सर्वच वह्या घेऊन माझ्या कडे आल्या.मी विचारले, "तुम्ही स्वतःकविता लिहिल्या?" "होsss",मुलींचा एकसूर. मी एकेकाच्या कविता वाचू लागले. त्यात नंदिनीची शब्दरचना वाचून मला आश्चर्यच वाटले.मी तिला दोनदा विचारले, "तूच लिहिलीस ना?" ती जोर देऊन म्हणाली,"हो मॅडम"

अतिशय सुंदर रीतीने तिने कविता लिहिली होती.इतर मुलींच्याही छानच होत्या.मी रचनेबाबत अधिक मार्गदर्शन केले व लिहिते होण्यासाठी वाचन किती महत्त्वाचे आहे हे समजावले.


ग्रुप लर्निंग

चंचल सोबत सेल्फी घेताना माझ्या मनातील आनंद ओसंडून वाहू लागला. चंचलचे स्टेटस ठेवले. दूस-या दिवशी परीपाठाच्या वेळी चंचलचे कौतुक करुन तिचे अभिनंदन केले व सर्वांसमोर तिला कविता सादर करण्यास सांगितले. त्या दिवशी ती दिवस-भर हिरो बनून फिरली. यामुळे मी चंचलचा वाढलेला आत्मविश्वास चेह-यावर स्पष्ट पाहू शकले. वर्गात गेल्यावर मुलींचा पुन्हा धिंगाणा. मग त्या तासात गावातील कचरा समस्येवर सर्वांनी मिळून एकेक ओळ तयार केली.

सहा पाय-यांच्या मदतीने 21 व्या शतकातील 6 कौशल्ये विकसित करण्यास कशी मदत होते याची पुन्हा एकदा प्रचिती आली.तसे तर,मुले रोजच आव्हानांवर काम करत आहेत परंतु माझ्या मुलांच्या क्रिएटिव्हिटीचा आनंद मला आज एक भाषा शिक्षिका म्हणून मिळाला होता.

मुलांवर विश्वास ठेवण्याची व संयमाने काम करण्याची ही दृष्टि मला भविष्यवेधी शिक्षण विचारांमुळेच मिळाली.

**वेध परीवाराचे शतशः आभार!**





**अनिता मगन चव्हाण-राठोड**
**कै.गुरुदयालसिंग राठोड प्राथ.,माध्य. व उ. माध्य. आश्रमशाळा ,गराडा, ता.कन्नड,जि.छत्रपती संभाजीनगर.**





# वेधची गाडी गौरीला तारी.



- **सुरेश बाहेकर**

सत्र 2024-2025 मध्ये इयत्ता पहिली मध्ये गौरी आकाश राजणे हिचे ॲडमिशन घेण्याकरीता तिचे आई-वडील दोघेही सोबत आले होते. ॲडमिशन झाल्यानंतर तिची आई मला म्हणाली ,"सर गौरी थोडी मतिमंद आहे, तिला जास्त समज नाही तरी तिला सांभाळून घेणे ही विनंती."मी इयत्ता पहिलीचा वर्ग शिक्षक असल्याने ही गोष्ट माझ्या मनाला लागून गेली आणि मी या गोष्टीवर सतत विचार करत राहायचो. तिची आई , असे का म्हणते ? तिला समज नाही आणि ती थोडी मतिमंद आहे . मी या विचार केला आणि मला वाटले की काही हरकत नाही. मी भविष्यवेधी शिक्षणाच्या सहा पायऱ्यांचा वापर करून गौरी मध्ये निश्चितच परिवर्तन करून दाखवेन असे मला वाटत होते आणि मला वेधची सिद्धता करण्याकरीता एक प्रकारचे संशोधनाचे चॅलेंज मिळाले होते. हे चॅलेंज मी हसत खेळत स्वीकारले होते, कारण कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये या दृष्टीने मी झपाटलेलो होतो.




**ज्या विद्यार्थ्याला निसर्गामधून कोणता प्रश्न पडला असेल त्याची चिठ्ठी त्यात टाकने आणि त्याने जिज्ञासे पोटी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देणे**

आम्ही इयत्ता पहिलीत सर्व प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना म्हणजे एकूण साठ विद्यार्थ्यांना एक एक जांभूळनीचे झाड , दिले. जसजसे झाड वाढेल तसतसे तुमच्या पाल्यांचे प्रगतीचे वर्ग उंचावेल. एक झाड गौरीच्या आई-वडिलांना सुद्धा दिले आणि त्यांना सांगितले की तुम्ही या झाडाची चांगली निगा राखा. मी तुमच्या मुलीची निगा राखतो .

वर्गाला सुरुवात झाल्यानंतर सर्वप्रथम मी भविष्यवेधी शिक्षणाची प्रथम पायरी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे याकडे जास्त लक्ष केंद्रित केले. मला माहीत होते की विद्यार्थी जोपर्यंत प्रेरित होणार नाही तोपर्यंत त्याचे शिक्षणाकडे लक्ष लागणार नाही. शिक्षण ही त्याची आवड कशी बनेल या दृष्टीने मी सर्व विद्यार्थ्यांना प्रेरित केले .नंतर इतर पाच पायऱ्यांचा वापर सुरू केला. त्यातील महत्त्वाची पायरी लर्निंग इंटरवेशन, त्या लर्निंग इंटर्व्हेशन मध्ये एका ग्रुप मध्ये ज्यामध्ये पिसा लेवलची मुले होती, न्यास लेवलची

होती आणि ही गौरी असर लेवलची होती .गौरीचा ग्रुप गौरीच्या इच्छेने तिने स्वतः निवडला आणि दररोज ती त्या ग्रुपमध्ये बसू लागली. मी सुलभक म्हणून विद्यार्थ्यांना दिशा देत होतो आणि काही शैक्षणिक साहित्याचा उपयोग करीत होतो.



नकली नोटाच्या माध्यमातून दैनंदिन व्यवहार, बेरीज, वजाबाकी ,गुणाकार आणि भागाकार शिकविणे

मुले मुली आपापसात एकमेकाकडून शिकत होते.गौरी सुद्धा पिसा लेवलच्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून थोडी थोडी शिकायला लागली आणि एका महिन्यानंतर मी गौरीचे विशेष करून परीक्षण केले.तिच्यामध्ये परिवर्तनाचा अंश मला दिसायला लागला, थोडा थोडा बदल वाटू लागला आणि मला आनंद वाटत होता की आपण योग्य दिशेने जात आहोत .आज गौरीची शाळा चालू होऊन पाच महिन्यातच गौरी साधे शब्द वाचन,. जोडशब्द ,इंग्रजी शब्द ,तर आता त्यानंतर दिलेला पॅरेग्राफ वाचन सुद्धा करू लागली.

इयत्ता पहिलीत अवघ्या पाच महिन्यापूर्वी दाखल झालेली विद्यार्थिनी भविष्यवेधी शिक्षणाच्या सहा पायऱ्यातून तिची शिक्षणाची गाडी वेधने प्रगतीच्या तीरावर नेली.

भविष्यवेधी शिक्षणात ,
शिकण्याची आहे पद्धत न्यारी,
मतिमंदही अभ्यासात घेई उंच भरारी
भविष्यवेधी शिक्षणाची
धरून कास
प्रत्येक विद्यार्थ्यांना यश येईल हमखास

**सुरेश बाहेकर**
**जि. प. प्राथमिक केंद्र शाळा तूपटाकळी**
**पं. स. दिग्रस, जी यवतमाळ.**




# स्वतः शिकण्यातील मज्जाच वेगळी..



• श्री. बळीराम मुरमे.

**नमस्कार !!!**

शैक्षणिक वर्ष 2022 -23 मध्ये संपूर्ण महाराष्ट्रात विमुक्त जाती भटक्या जमातीच्या 977 शाळांमध्ये शिक्षकांसाठी निपुण भारतच्या MOLIC ट्रेनिंग मुळे शिक्षकांचे काम निम्मे ,परिणाम दुप्पट व स्वतः शिकण्यातील आनंद तिप्पट याची प्रचिती आली. या प्रशिक्षणातील मुख्य भाग म्हणजे लर्निंग इंटरव्हेन्शन( learning intervention) . यात मुलांना शिकण्यासाठी प्रेरित करणे, मुलांना आव्हाने देणे, विषय मित्र, सेल्फी विथ सक्सेस, यासारख्या 21 व्या शतकातील वेगाने शिकण्यासाठी लागणाऱ्या तंत्रांचा प्रभावी वापर कसा करावा याविषयीचे प्रशिक्षण झाले होते.

त्या अनुषंगाने माझे शाळेत माझ्या मुलांसोबत काम सुरु झाले.मुलांना आव्हाने दिले की ते सोडवायला खूप आवडतात. हा माणसाचा मूळ स्वभावच आहे. त्यांच्या क्षमतेचा पूर्ण वापर करून विद्यार्थी आव्हान सोडवतात व सर्वाधिक आव्हाने सोडवण्याची स्पर्धा सुरु झाली.विद्यार्थी एकमेकांसोबतच स्पर्धा करता करता स्वतः सोबतच स्पर्धा करु लागली आणि क्षमतेपेक्षा अधिक व्यक्त होऊ लागली. याचा खूप आनंददायी अनुभव मला आला. दीपावलीच्या सुट्ट्यांमध्ये विद्यार्थ्यांना एक आव्हान दिले होते. परिपाठात नेहमी बोधकथा सांगण्याची समस्या होती, म्हणून दीपावलीच्या सुट्ट्यात सर्वाधिक बोधकथा पाठांतराचे हे मराठी भाषा विषयाचे आव्हान होते म्हणून दीपावलीच्या सुट्ट्यात सर्वाधिक बोधकथा पाठांतराचे हे मराठी भाषा विषयाचे आव्हान होते. यात संत गाडगेबाबा प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा अंजनडोह तालुका जिल्हा छत्रपती संभाजी नगर शाळेतील वर्ग सहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी आव्हान स्वीकारले व शाळा सुरू झाल्यानंतर हर्षदा गणेश शेजुळ या वर्ग सहावीच्या विद्यार्थीनीने 1500 बोधकथा पाठांतराचा भीम पराक्रम केवळ वीस दिवसातील सुट्ट्यात करून दाखवला. यात मराठी सह इंग्रजी आणि हिंदी सुद्धा बोधकथांचा समावेश होता. याबद्दल सेल्फी विथ सक्सेस घेण्याचा मानही तिने पटकावला. राजस्थान राज्याचे महामहीम राज्यपाल व पंडित दीनदयाल उपाध्याय



**विषय मित्राच्या साह्याने विद्यार्थी पाठ समजून घेतांना,**

शिक्षण संस्थेचे अध्यक्ष असलेले मा.श्री. हरिभाऊ जी बागडे नाना शाळा भेटीदरम्यान जेव्हा विद्यार्थ्यांशी

हितगुज करत होते, तेव्हा या विद्यार्थीनीने आव्हानाने कशी जादू घडते याचा परिपाठच सांगितला आणि एक मराठीतील व एक हिंदीतील बोधकथा ही सादर करून दाखवली.

तिच्या बोलण्यत आत्मविश्वास इतका प्रचंड होता की पुढच्या बोधकथा ही सांगण्याचा आग्रह तिने धरला. कितीही मोठे व्यासपीठ मिळाले, तरी हे विद्यार्थी अगदी सभेत धीटपणे व्यक्त होत आहेत.

महामहीम राज्यपालांसमोर देखील हा आत्मविश्वास तसूभरही कमी झाला नाही.

सर्व मुले अत्यंत धिटाईने आव्हाने आणि लर्निंग इंटरव्हेन्शन बद्दल माहीती सांगताना ऐकून साहेबांना आश्चर्याचे धक्केच बसले.

साहेबांना या चिमुकलीचे प्रचंड कौतुक वाटले.

हे सर्व पाहून मला किती आनंद होत होता हे मी शब्दात नाही सांगू शकत.



**महामहीम राज्यपाल यांचे स्वागत करतांना विद्यार्थी**

आव्हाने देऊन मुलांना अशा रीतीने स्वयंप्रेरीत करता येऊ शकते.

प्रत्येक विषयाचे पाठानुसार कोणते आव्हाने देता येतील याची यादी एकदा शिक्षकांनी बनवली की, आव्हान सोडवताना विद्यार्थी रममाण आणि आपसूकपणेच त्यांचा अभ्यास होतो.

हे केवळ आणि केवळ जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण विचारांच्या माध्यमातूनच शक्य आहे. ही आहे आव्हानाची जादू आणि त्यातून मिळालेला स्वतः शिकण्याचा विश्वास . हा एक चमत्कारच आहे.

धन्यवाद



**श्री. बळीराम मुरमे.**
**संत गाडगेबाबा प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा,**
**छत्रपती संभाजीनगर.**



# वेध परिवार !

नमस्कार मित्र मैत्रीणींनो (अशा सर्वांना ज्यांना मुलांच्या शिक्षण प्रक्रियेत शिकण्याची गती वाढवून सतत शिकते करण्याची इच्छा आहे.)

**मित्रांनो "वेध" विषयी थोडेसे...**

"रोज भेटती, साधती संवाद मिटविण्या शिकण्याचा भेदा-भेद
सर्वांसवे दिला जाईल मूल न शिकण्याच्या समस्यांना छेद
असा कार्यतत्पर परिवार त्यास म्हणती वेध "

**१००% मुलांच्या शिकण्याची गती वाढावी, जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण मिळावे यासाठी सातत्याने काम करणारा परिवार म्हणजे वेध.**

वरील ध्येय उराशी बाळगून प्रेरित झालेल्या भारत देशातील (सध्या भारतातील परंतु भविष्यात जगातील) व्यक्तींचा हा समूह आहे. ही कुठली संघटना नाही, याची कुठे शाखा नाही. वेधमध्ये काम करण्यासाठी कुठली विशिष्ट पात्रता नाही. अपेक्षा एकच, मुलांच्या शिकण्यात आणि शिकण्याची गती वाढवण्यासाठी योगदान द्यायचे असेल तर स्वतःचा वेळ व श्रम गुंतवण्याची तयारी हवी. वरील अपेक्षेची पूर्तता होण्यासाठी ध्येय स्पष्ट असणे, ध्येयाच्या प्राप्तीबाबत आत्मविश्वास असणे आणि त्या धेयाच्या प्राप्तीसाठी तुम्ही स्वयंप्रेरित असणे अनिवार्य आहे. असे ध्येय, आत्मविश्वास व पात्रता असणाऱ्या व्यक्तींचा समूह वेध आहे. आपणा सर्वांच्या ध्येयपूर्तीसाठी हक्काचे व्यासपीठ वेध आहे. या प्रकारच्या प्रत्येक व्यक्तीचे वेध परिवारात स्वागत आहे.

शिक्षणातून वेध कोणते उदिष्ट प्राप्त करू इच्छित आहे?

1. **असे व्यक्तित्व विकसित करणे ज्याला जागतिक स्वीकार्यता असेल.**
2. **असे व्यक्तित्व जे भविष्यासाठी तयार असेल.**
3. **100 टक्के मुलांच्या 100 टक्के क्षमतांचा विकास.**
4. **PISA रेडी (21व्या शतकातील कौशल्य असणारी) मूल तयार करणे.**

मित्रांनो आपणास ज्ञात आहेच की मागील 75 वर्षांपासून आपण 100 टक्के मुलांना FLN यावे यासाठी संघर्ष करत आहोत. आजवर अनेकविध उपक्रम केले, विविध आयोग आणले, खूप सारे प्रयोग केले. तन, मन, धन लावूनही १०० टक्के मुलांचे शिकणे होत नसेल, आपणास अडचणींना सामोरे जावे लागत असेल तर तुम्ही वेधसोबत जुळायला हवेत. इथे आम्ही दावा करतोय ....

**"तुमचे श्रम निम्म्यावर येतील, परिणाम दुप्पट आणि आनंद तिप्पट होईल."**

वरील दावा वेध परिवार कशाच्या आधारे करत आहे? भविष्य वेधी शिक्षण विचारच्या सहा पायऱ्या केल्यास मुलांच्या शिकण्याची गती वाढेल आणि त्यांना जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण मिळेल. एव्हढे सगळे होऊन तुमचे श्रम निम्म्यावर येईल.

**"भविष्यवेधी शिक्षणाच्या सहा पायऱ्या**
**टेक्झॉनॉमी ब्लुमची**
**हावर्ड गार्डनरच्या ९ बुध्दीमत्ता**
**6 - C शिदोरी आहे वेधची"**

वरील बाबींचा समावेश करून समर्पक शिक्षण प्रक्रिया विकसित करण्यासाठी मागील २ वर्षांपासून रोज रात्री 9 ते 10.30 झूम वर एकत्र येऊन काम करत आहोत. दिवसभर शालेय कामकाज, स्वतःचा संसार सांभाळून (घरातील सर्व जबाबदाऱ्या ज्यामुळे अनेकांना घर सोडता येत नाही असे सर्वजण जिथे आहेत तेथून काम करत आहेत. जे आपणासही सहज शक्य होणार आहे.) दररोज रात्री दीड तासाचा वेळ देतोय. समस्येच्या मुळाशी जाऊन पुढच्या कामाची दिशा ठरवतोय. यासाठी वेध चे 21 विषयांचे विभाग काम करताय, शिवाय वेध उत्सव, वेधगोष्टी या विभागात वेधस्रोत योगदान देत आहेत. सर्वात महत्त्वपूर्ण बाब म्हणजे वेधकृतींची निर्मिती. यामधे क्रमिक स्वरूपात स्वतःच्या क्षमता लक्षात घेऊन मूल स्वतः शिकत राहील याचे नियोजन आहे. वेधकृती म्हणजे मूल स्वतः शिकतील यासाठी संकल्पना आधारित इंटिग्रेटेड साप्ताहिक नियोजन आहे. इयत्ता, वय किंवा वर्ष याचे बंधन न ठेवता मुलांना हवे तसे शिकत जाता येते. शिकून झाले असल्यास क्रमाने पुढील इयत्तेतील संकल्पना सहज शिकता येतात.

सातत्यासह सयंमाने वाटचाल
आत्मसन्मान, आत्मविश्वासाची ढाल
कयामत की रात/ दिन ची कमाल
वेध आहे स्वयंप्रेरणेची पेटती मशाल

चला तर मग आपल्याकडे उपलब्ध वेळेत, सर्वांगाने विचार करत, स्वतः आनंद घेत इतरांना आनंद देऊ. मुलांना स्वतः व अधिक गतीने शिकण्याच्या, भविष्याचा वेध घेण्याच्या दिशेने झेप घेऊ या. या रोमांचकारी प्रवासात आदरणीय नंदकुमार सर (ज्यांनी आयएएस असूनही आयुष्याची तीस वर्ष शिक्षणासाठी अर्पण केली) आणि आम्ही सर्व वेधस्रोत तुमच्यासोबत आहोत. अपेक्षा आहे तुम्हालाही सोबत यायला आवडेल.



**वेध परिवार**



# जादू आव्हानाची, वाढली गती स्वत: शिकण्याची



• सौ. नेहा जयंत गोखरे

**सर्वांना नमस्कार,**

मला वेध वर्क टीमसोबत काम करताना जवळपास आता तीन वर्षे झालेली आहेत. माझ्या वर्ग स्तरातील विद्यार्थ्यांचे बरेचसे अनुभव पाठीशी आहेत.परंतु या ठिकाणी सर्वात अगोदरचा जो मला आलेला अनुभव आहे तो सादर करताना जास्त आनंद वाटेल,कारण येथूनच माझ्या शिक्षण क्षेत्रातील कार्याला खरी गती मिळाली; एक नवा मार्ग मिळाला.

वेध वर्क टीमसोबत येण्यापूर्वी मी खूप मेहनत घ्यायचे, विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे साहित्य तयार करायचे,घसा कोरडा होईपर्यंत शिकवायचे,परंतु पाहिजे तसे आउटपुट मात्र मिळत नव्हते. मुलांना कितीही शिकवा,परंतु परीक्षा आली की मुलं भांबावून जायची. कुणी वर्गात आले तरी मुलं अपेक्षित ते उत्तर देत नव्हते. या परिस्थितीतून निघण्यासाठी मी काय करावे? या विचारात असतानाच मला भविष्यवेधी शिक्षणाचा मार्ग मिळाला.

मी वेध ग्रुपसोबत जोडले गेले. भविष्यवेधी शिक्षण प्रणाली ची स्ट्रॅटेजी समजून घेतली,आणि ती अमलात आणण्याचा वर्गात प्रयत्न सुरू केला. खरोखरच मला भन्नाट असा रिझल्ट मिळायला सुरुवात झाली.

जर्मन भाषेत सवांद साधताना विद्यार्थी



मी वेध ग्रुपसोबत जोडले गेले. भविष्यवेधी शिक्षण प्रणाली ची स्ट्रॅटेजी समजून घेतली,आणि ती अमलात आणण्याचा वर्गात प्रयत्न सुरू केला. खरोखरच मला भन्नाट असा रिझल्ट मिळायला सुरुवात झाली.

आपणा सर्वांना माहीत आहेच , की दैनंदिन जीवन जगत असताना प्रत्येकालाच आव्हानांना सामोरे जावे लागते, जितके आव्हानांना सामोर जाऊ तितकी कार्यक्षमता वाढीस लागते.

मोठ्या पासून तर लहान बालकांपर्यंत सर्वांनाच आव्हानांशी सामना करावा लागतो. तेव्हा फरक असतो तो आव्हानांचा.

ज्यांनी जी आव्हाने स्वीकारली त्यानुसार त्याचे व्यक्तिमत्त्व घडत जाते.

खरेतर आव्हान म्हणजे एक चालना, बुद्धीला मिळालेले खाद्य,जितके आव्हान मोठे तितका विकास गतीने होतो आणि जर का लहान

वयातच मुलांना आव्हानांची सवय लावली ,तर त्यांच्या बुद्धीची कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात विकसित होते.

भविष्यवेधी शिक्षणाच्या ज्या सहा पायऱ्या आहेत त्यापैकी आव्हानातून शिक्षण ही पायरी मला विद्यार्थ्यांना अधिक परिणामाच्या दिशेने नेणारी ठरली .

असाच एक आव्हानात्मक प्रसंग मी आपल्यासमोर सादर करीत आहे.

गणित विषय म्हटलं की पाढा आलाच;म्हणून मुलांना दररोज पाढे पाठ करण्यासाठी सांगायचे.काही मुलं पाढे पाठ करायचे तर काही कंटाळा करायचे, तर ज्यांनी काही पाठांतर केले आहे ते लवकरच विसरूनही जायचे.मुलांना हे काम रटाळवाणे वाटायचे.आता काय करून मुलांना याकडे प्रेरित करता येईल? असा विचार मी करू लागले.म्हणतात ना 'इच्छा तेथे मार्ग' आणि मला मार्ग मिळाला.माझ्या वर्गात त्या दिवशी इयत्ता दुसरी ते पाचवी चे विद्यार्थी बसलेले होते. मी मुलांना म्हणाले, "आज आपण पाढे पाठ करायचे नाही, तर पाढे स्वतः तयार करायचे." सर्व मुले एकाग्रतेने माझ्याकडे बघायला लागली. मुलांना मी 17 चा आणि 18 चा पाढा कसा तयार करायचा हे trick देऊन शिकविले. प्रत्येक पाढ्याची trick वेगवेगळी होती.सम-विषम संख्या वापरून पाढा तयार करायचा होता.त्याचा क्रम सुद्धा प्रत्येक पाढ्यात वेगवेगळा वापरायचा होता.त्यानंतर मी मुलांना म्हणाले "बघुया आता कोण-कोण वेगवेगळी ट्रिक वापरून पाढा तयार करते." "तुमच्यासाठी आजचे हे challenge ....so let's start."



ग्रुप मध्ये आव्हाने सोडवितांना विद्यार्थी

आणि हे प्रत्येकाने वैयक्तिक करायचे आहेत. असे सांगून मी इयत्ता दुसरीच्या गटाकडे गेली.

खरं तर तसं ही ट्रिक वापरून पाढा तयार करणे हे काम थोडं कठीणच होतं कारण प्रत्येक पाढ्याला वेगळी ट्रिक वापरायचे होते;आणि क्रम सुद्धा वेगवेगळा घ्यायचा होता.मला वाटलं ते मुलांना अवघड जाईल.बघूया काय करतात मुले तर... असा विचार करीत मी मुलांचे गृहपाठ तपासण्याचे काम करीत होते. पंधरा वीस मिनिटानंतर माझ्याजवळ मुलांनी गलका केला;आणि मी ते बघून अवाकच झाले.मुलांनी त्यांच्या कल्पकतेने ट्रिक वापरून 5 ,9 ,15 ,22,11, 19,23 असे विविध पाढे तयार केले होते.मला खूपच आनंद झाला. पाचवीतील सानिका ने तीनही पाढे अचूक तयार केले होते. चौथी आणि तिसरीतील विद्यार्थ्यांनी देखील अचूक पाढे तयार केले होते. विशेष म्हणजे दुसरीतील उत्कर्ष ने 10 चा पाढा स्वतः तयार केला होता. त्याला मी विचारले ,"तू हा दहा चा पाढा कसा तयार केला?" त्यांनी मला छानशे स्पष्टीकरण दिले.तो म्हणाला," मी सर्वात आधी एक पासून दहा पर्यंत अंक लिहून घेतले,आणि त्यानंतर क्रमवार मी 1 पासून ते 10 पर्यंत 0 ठेवत गेलो अशाप्रकारे माझा दहाचा पाढा तयार झाला.आणि मी पुन्हा दुसरा पाढा तयार करतो टीचर." असे म्हणून तो धावत

आपल्या जागेवर पळाला.

मला त्याचे खूपच कौतुक वाटले कारण इयत्ता दुसरी कडून मी ही अपेक्षाही केली नव्हती त्यांना मी दुसरं काम दिलेलं होतं.तरीदेखील त्याने त्याच्यासोबतच आपलं हेही चॅलेंज पूर्ण केलं होतं. याचा मला खरोखरच खूपआनंद वाटत होता.कुशाग्र बुद्धिमत्ता असलेल्या उत्कर्ष ने यापूर्वीही बरेचसे उदाहरणांचे चॅलेंज पूर्ण केलेलं होतं. वर्गातील बहुतांश मुलांनी पाढा तयार करण्याचा प्रयत्न केलेला होता.ज्यांना पाढा पाठ करायचा कंटाळा यायचा त्यांनी तर यामध्ये हिरीरीने भाग घेतला होता.

त्यामध्ये काहींच्या थोड्या चुका ही होत्या पण त्यांनी खूप छान प्रयत्न केला होता .यामध्येच मला खूप मोठे समाधान वाटत होते. कुठे कोणती ट्रिक वापरली ,कुठे सम, विषम संख्यांचा क्रम कसा घेतला आहे . हे सर्व मुलांनी मला स्वतः सांगितले होते. मला मनोमन खूपच आनंद होत होता मुलांचा आत्मविश्वास त्यांच्या चेहऱ्यावर झळकत होता आणि मुलं मला परत म्हणू लागली की टीचर आम्ही आता असेच पाढे तयार करणार.सर्व मुलांसोबत मी एक सेल्फी घेतला व त्यानंतर मुलांचे कौतुक करून चॉकलेट वाटले.

खरंच मूल स्वतः शिकतं, हा विश्वास मला भविष्यवेधी शिक्षणातून मिळालेला आहे. त्यासोबतच आव्हानातून शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गती विकसित करते व विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करते, याचे उदाहरण मी आपल्या समोर सादर केलेले आहे. विद्यार्थ्यांना जेव्हा एखादी गोष्ट स्वतःहून यायला लागली तेव्हा त्यांचा आत्मविश्वास कमालीचा असतो. आणि ते या कार्यासाठी स्वयंप्रेरित होत जातात.

भविष्यवेधी शिक्षणाच्या पायऱ्यावर काम करताना दररोज असे नवनवीन अनुभव मला येत आहे. आता तर वर्गातील विद्यार्थी स्वयंप्रेरित झालेले आहेत. मराठीतच नव्हे तर इंग्रजी आणि जर्मनीत देखील पाढे स्वतः तयार करून सादर करीत असतात.

इतर विषयांसोबतच माझ्या वर्गातील विद्यार्थी जर्मन भाषेमध्ये स्वतः वाक्य तयार करतात लिहून दाखवतात. छोटे छोटे संवाद करतात. तसेच कुठलीही संख्या, जन्मतारीख मोबाईल नंबर हे देखील जर्मनीमध्ये सांगतात. मुलांचा जर्मन भाषेच्या अभ्यासक्रमातला 'ए वन स्तर' जवळपास झालेला आहे. हे सर्व भविष्यवेधी शिक्षणाच्या पाच पायऱ्या मुळे शक्य झाले आहे. म्हणूनच मला माझा अनुभव सादर करताना इथे आवर्जून सांगावसं वाटतं की,

**भविष्यवेधी शिक्षणाची कास धरूया**
**चिमुकल्यांना आपल्या प्रगतीपथावर नेऊया.**





**सौ. नेहा जयंत गोखरे**
**जि.प. शाळा सिंदीवाढोणा**
**पं. स., झरीजामणी, जिल्हा यवतमाळ**





# LEARNING INTERVENTION ची साथ, गणिताच्या भीतीवर मात

• ज्योती खरात



**नमस्कार ...**

मी ज्योती खरात.जि. प. कें. प्रा. शा. कुंभेफळ ता., जि. छ. संभाजीनगर या शाळेत मी कार्यरत आहे. गेली अनेक वर्षे मी अध्यापन करण्याचे काम करत आहे. माझ्याकडे शाळेमध्ये सामाजिक शास्त्र, इंग्रजी, गणित असे विषय शिकवण्यासाठी आहेत. हे विषय शिकवत असताना मी जेव्हा मुलांना व्याख्यान पद्धतीने ह्या सर्व गोष्टी शिकवत असे त्यावेळी बोलून बोलून माझ्या घसा कोरडा पडत असे.

इतिहासासारखा माहितीच्या स्वरूपात असलेला विषय शिकविताना प्रचंड प्रमाणात बोलावे लागल्याने माझी ऊर्जा खर्च होत होती आणि हे काम खूप दमवणूक करणारे होते.

मुलांचे शिकणे सोपे करण्यासाठी आणि स्वतःची एनर्जी वाचविण्यासाठी काय करता येईल? यासाठी मी शाळेतील विद्यासागर मॅडम यांच्यासोबत अधून मधून चर्चा करत असे. त्यांनी मला, "मुलांना पियर आणि ग्रुपमध्ये काम वाटून देऊन त्यांना स्वतः शिकण्यास प्रेरित करा". असे सांगितले.

दरम्यानच्या काळात माझे अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन हे प्रशिक्षण पूर्ण झाले आणि त्या प्रशिक्षणानंतर मला मुलांना शिकते करण्याची एक वेगळीच दृष्टी मिळाली.

प्रशिक्षण घेऊन आल्यानंतर मी मुलांचे पियर आणि गट असे नियोजन केले आणि त्यांना सांगितले, "इथून पुढे मी तुम्हाला शिकण्यात जिथे अडचण येईल, तिथेच मदत करेल ,मात्र मी तुम्हाला काहीही शिकवणार नाही, सर्व गोष्टी तुम्हाला शिकायच्या आहेत". मी मुलांना सांगितले की आपल्याला गणितातील भागाकार ही क्रिया शिकायची आहे, मात्र ती तुम्ही स्वतः शिकणार आहात. मुलांनी स्वतः शिकण्याची तयारी दाखवली आणि ते भागाकार स्वतः शिकण्यासाठी काम करू लागली आणि अगदी दोन दिवसातच माझ्या वर्गातील 35 मुले भागाकार शिकली. अजान नावाचा विद्यार्थी गणिताला घाबरत होता,त्यामुळे गणिते करण्याचे काम सांगितले की तो इंग्रजी विषय काढून बसत होता. त्याला देखील मी हेच सांगितले की, तुला देखील गणिताला न घाबरता तो विषय शिकायचाच आहे आणि तोही स्वतःच्या प्रयत्नातून गणिताकडे वळला. मुलांचे हे यश पाहून मी खूप आनंदी झाले आणि त्यांना नंतर मी इतिहासाचे काही घटक, इंग्रजीचे काही घटक, मुलांनी एकमेकांना शिकवावेत यासाठी नियोजन करून दिले. मुलांना तयारी करण्यासाठी एक दिवसाचा वेळ दिला. दुसऱ्या दिवशी मुलांनी त्यांना दिलेले विषय आपल्या गटामध्ये वर्गासमोर अतिशय अस्खलितपणे स्पष्ट करून सांगितले. काही मुलांनी तर हातात पुस्तक देखील घेतले नव्हते.

भविष्यवेधी शिक्षण प्रक्रिया ही मला आता हळूहळू उमगत चाललेली आहे आणि मुलांना स्वतः शिकण्यासाठी प्रेरित करणे, त्यांना आव्हान देणे, त्यांचे पीयर आणि गृपमध्ये शिकण्याचे नियोजन करणे अशा अनेक गोष्टी मी आता बारकाईने अभ्यासून माझ्या वर्गात त्याचे प्रयोग करणार आहे.



**ज्योती खरात**
**जि. प. कें. प्रा. शाळा कुंभेफळ**
**ता. जि. छ.संभाजीनगर**




# वारे भविष्यवेधी शिक्षण विचारांचे



• सोनाली मधुकर पाटील

**नमस्कार.....**

अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन या प्रशिक्षणापूर्वी माझ्या मनात अनेक प्रश्न होते. माझ्या वर्गातील शंभर टक्के मुलं का प्रगत नाहीत? माझे नियोजन चुकते आहे का? मी शिकवण्यात कमी पडते आहे का? या सर्व प्रश्नांची उत्तरे मला अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन प्रशिक्षणातून मिळाली.

उत्तरे मिळाल्याबरोबर जेव्हा प्रत्यक्ष अध्ययन- अध्यापन प्रक्रियेचा अवलंब केला तेव्हा रिझल्ट जादुई होते. शंभर टक्के उपस्थितीचे आव्हान ,त्यानंतर वेळेवर शाळेत कोण येतो? ही आव्हाने पूर्ण करण्याच्या धडपडीत वर्गाची उपस्थिती वाढून शाळेत उशिरा येणाऱ्यांच्या संख्येत घट झाली. आता माझ्या वर्गातील मुले आव्हान प्रिय झालेली आहेत. वर्गात पाऊल टाकताच "मॅडम आम्हाला चॅलेंज द्या मग सही करायला जा!" किंवा "मग हजेरी घ्या" असा त्यांचा हट्ट असतो हल्ली तर जेव्हा मला एखादे आव्हान सुचत नसेल तर मुलं स्वतः त्यांच्या मनाने आव्हान तयार करून सांगतात. "मॅडम आज हे आव्हान द्या बरं!" मुलांमध्ये चुरस निर्माण झाली आहे. शिकण्याच्या गतीमध्ये आधी पेक्षा दुप्पट वाढ जाणवते.









स्वतःच्या दुसरीच्या पाठ्यपुस्तकातील शब्द मर्यादा संपल्यावर आणखी शब्द शोधण्यासाठी आता ते दुसऱ्या वर्गाचा उंबरठा ओलांडून तिसरीच्या, चौथीच्या, पाचवीच्या किंवा सहावी सातवीच्या वर्गात पळत जाऊन त्यांची पुस्तके घेऊन येतात. एखादा शब्द समजला नाही, तर विषय मित्राची मदत घेतात. चार अक्षरी इंग्रजी शब्द शोधताना तर त्यांनी शाळेतील सर्व इयत्तांची इंग्रजी पुस्तके चाळली. तर काही विद्यार्थी म्हणत होते, "मॅडम आता आम्हाला इंग्रजी न्युज पेपर द्या ना! त्यातून आम्हाला शब्द शोधता येतील!"

आमच्या शाळेत इयत्ता तिसरीपासून परिपाठ घेतला जातो पण माझ्या दुसरीच्या मुलांनी आपापसात आव्हान घेतले की आपणही परिपाठ सादर करायचा. माझी कोणतीही मदत न घेता त्यांनी त्यांचे परिपाठाचे गट तयार केले. शाळा स्तरावरील पियर, गृप मधील मोठ्या मुलांची मदत घेऊन परिपाठाची आवश्यक सर्व सामग्री मिळवून छान परिपाठ सादर केला. यावेळी मी अक्षरशः अवाक् झाले होते.

आमच्या वर्गातील अलबाज, ईश्वरी,आयुष, श्रवण तर एवढे स्वयंप्रेरित आहेत की इंटरवल टाईम मध्ये वर्गाचा 'वर्ड बँक' उपक्रम घ्या म्हणून सांगायला मी जाते आणि "केव्हाच घेऊन झाला मॅडम!" असे उत्तर येते. भाग चौथा पुस्तक तर वार्षिक नियोजनात मी लिहिलेल्या वेळेपूर्वी या मुलांनी संपवले सुद्धा!

आता रोज इयत्ता तिसरीचे भाग एक चे पुस्तक घेऊन येतात आणि वाचत बसतात. त्यामुळे जी असर लेवलची मुले आहेत त्यांच्यासाठी विशिष्ट आव्हान देण्यासाठी मला वेळ मिळत आहे. थोडक्यात काय तर मला प्रशिक्षणातून प्रश्नाची उत्तरे मिळाली होती खरी, पण हे सर्व प्रॅक्टिकली पॉसिबल आहे का? या शंकांचे माझे समाधान खऱ्या अर्थाने आता होत आहे. या प्रशिक्षणानंतर माझी मुले खऱ्या अर्थाने स्वयंप्रेरित जिज्ञासु, आव्हान देणारी आणि घेणारी,आव्हाने पूर्ण करणारी बनली आहेत. शिकण्याची गती खरंच वाढली आहे. मुलांच्या शिकण्यात आलेले हे सकारात्मक बदल हे माझ्यासाठी खरोखर सुखकारक आहेत.






**सोनाली मधुकर पाटील**
**जि प प्रा शा बनगाव,**
**तालुका ,जिल्हा छत्रपती संभाजीनगर**

# अंक क्र.१ ला वाचकांचा मिळालेला प्रतिसाद

## अभिप्राय



- **स्वाती रामचंद्र खुडे (उनवणे)**

**"स्वयंअध्ययनातून भविष्यवेधी शिक्षणाकडे"**

"First impression is the last impression."

⭐ याप्रमाणे या अंकाचे मुखपृष्ठ, अंकाच्या शीर्षकाला समर्पक आहे.प्रत्येक मूल स्वयंअध्ययनातून भविष्यवेधी शिक्षण शिकायचे कसे? हे शिकते होते. हा वेध विचारांचा गाभा मुखपृष्ठात स्पष्ट होताना दिसत आहे.

⭐ अनुक्रमणिका- अंक वाचण्यास उत्कंठा वाढवते.

⭐शिकायचे कसे? हे शिकणे हा वैश्विक विचार पुढे आणून मुलांना गतीने शिकण्यास प्रेरित करणे, हा भविष्यवेधी शिक्षणाचा पाया आणि संपूर्ण सार वेध सृजनअंक पार्श्वभूमीत सांगितला आहे.

⭐इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या वर्ग असणाऱ्या आश्रम शाळेत google ट्रान्सलेटरचा वापर करून जपानी भाषा अवगत करून देणाऱ्या श्री. विठ्ठल कचरे सरांचे नेतृत्व नियोजन आणि व्यवस्थापन कसे असावे हे आवडले.तंत्रज्ञानाच्या मदतीने पिसा लेवलचे विद्यार्थ्यांचे मातृभाषा मराठी ,जागतिक भाषा इंग्रजी आणि परकीय भाषा(जपानी) यांचे प्रभुत्व प्राप्त होणे कौतुकास्पद आहे.

⭐वर्गातील अबोल शांत अकाली प्रौढत्व आलेल्या मुलाला स्वयंप्रेरणेने शिकते होण्यासाठी त्याचा गौरव करणारी, त्याच्या उपजत गुणांना प्रोत्साहित करणारी 📷SELFY WITH SUCCESS📷 ची जादू सविता पाटील, अल्का फुलझेले,योगेश सोसे सर यांच्या अनुभवलेखनातून कळली.

⭐जगाच्या कानाकोपऱ्यातून इतिहासाच्या पानांवर सुवर्ण अक्षराने ज्यांनी नावे कोरली त्या प्रेरणास्त्रोत आदरणीय यांचे व्यक्तिमत्व आणि व्यक्तित्व आपल्याला नवनिर्मितीची प्रेरणा, जिज्ञासू वृत्ती, शिकण्याची तिप्पट गती, SKILL DEVELOPMENT आणि निसर्गनिर्मित बुद्धिमत्ता यांचा उपयोग करून जगात कुठेही स्वीकार व्हावा असे व्यक्तित्व बनवणे अशक्य नाही हे श्री. नितीन टाक सरांच्या अनुभव लेखनातून कळले.




<u>**'वेध सृजन' चे मागील अंक क्र.१ वाचण्यासाठी येथे क्लिक करा.**</u>

⭐प्रत्येक शिक्षकाच्या वर्गात एक तरी गोपाल असतोच आणि त्याच्यासारख्या मुलांमध्ये इच्छित बदल

घडून आणण्यासाठी विद्यार्थ्यांच्या जाणिवेच्या आणि चिंतनाच्या पातळीवर जाऊन स्वतःमध्ये बदल घडवून आणण्यापर्यंत शिक्षकाने संयम कसा ठेवावा हे धरती आटे मॅडम यांच्या अनुभवातून कळले.

⭐विद्यार्थ्यांना आव्हाने देऊन विद्यार्थी ती आव्हाने कशी पूर्ण करतात आणि त्याचा RESULT,आव्हाना नंतर विद्यार्थ्यांनी केलेली कार्यवाही याची जादू श्री. गजानन तुरारे, शुभांगी मुसळे ,नंदा गिरडकर मॅडम यांच्या अनुभव लेखनातून कळले.

अशा या भविष्यवेधी शिक्षणाच्या अथांग सागरातील शिंपल्यातील अनुभवरुपी मोत्यांचे प्रथम पुष्पवाचन केल्याने " पुनश्च शुभारंभ" या उक्तीप्रमाणे मी ही मूल शिकण्यास शिकते करण्यास शुभारंभ केला आहे.

⭐ यासाठी वेध सृजन अंकाचे प्रेरणास्थान तथा मार्गदर्शक श्री नंदकुमार साहेब, संपादक निलेश घुगे, कार्यकारी संपादक श्री. प्रभाकर हिप्परगे,

⭐ संपादन सल्लागार रोहिणी विद्यासागर ,अशोक निकाळजे सर, संपादक सचिव प्रियंका पाटील .

⭐त्याचबरोबर या अंकाचे संपादन सहाय्य करणाऱ्या अनिता राठोड,हर्षदा चोपणे ,गजानन तुरारे, ललित उदापुरे ,कविता खैरनार,दीपेश पुरोहित आणि पुणे जिल्हा वेध समन्वयक श्री.नितीन मेमाणे सर यांचे खूप खूप मनःपूर्वक धन्यवाद 🙏🙏

" EVERY BOOK THAT YOU READ GIVES YOU A DIFFERANT KEY TO YOUR SUCCESS."

😊🙏THANK YOU🙏😊



**स्वाती रामचंद्र खुडे (उनवणे)**
**जि.प.प्राथ.शाळा,गडाची वाडी(खोडद)**
**ता.जुन्नर,जि.पुणे.**





# वेधकृतीची कमाल आनंदी बालगोपाल





• अमिता नरेन्द्र राउत

**हॅलो नमस्कार....**

मी अमिता नरेंद्र राऊत. वसंतराव नाईक आश्रम शाळा, गोंदी, तालुका काटोल, जिल्हा नागपूर येथे मागील वीस वर्षांपासून शिक्षिका म्हणून कार्यरत आहे.माझ्या वर्गात 'वेध कृती' अंतर्गत स्पोकन इंग्लिश हा उपक्रम मी वर्ग पहिली आणि दुसरी या वर्गामध्ये घेत आहे. मी स्पोकन इंग्लिश घेण्याची सुरुवात केलेली आहे. त्यामध्ये सर्वात आधी बॉडी पार्ट्स हा विषय घेतला .बॉडी पार्ट्स घेताना मला अनेक नवनवीन अनुभव आले. त्यात सर्वात महत्त्वाचा अनुभव असा की, माझ्या वर्गामध्ये बहुभाषिक मुलं आहेत म्हणजे आपल्या घरात बोलणारी भाषा त्यांची वेगळी आहे जसं भिल्ल, पावरा, बंजारा आणि इतर मराठी मुलं यामुळे प्रत्येकाची घरी बोलली जाणारी भाषा वेगळी आहे. त्यात सर्वप्रथम बॉडी पार्ट्स सोबतच काही आपल्याला येणारी नवीन इंग्रजीतील शब्द सांगूया असे जेव्हा मुलांना कळाले, तेव्हा त्यांना थोडी भीती वाटली, की आपण इंग्लिश मधले शब्द कसे सांगू? पण जेव्हा नियमित वापरात येणारे टेबल, पेन , पेन्सिल,असे शब्द मी त्यांना सांगितले की इंग्लिश मधले आहे तेव्हा त्यांना आश्चर्य पण वाटले आणि आनंदही झाला,की खूप सारे असे शब्द आहेत की जे आपण रोज बोलत असतो. ते इंग्लिश मध्ये आहे.प्रत्येक भाषेत काही साम्य आहे आणि त्या आधारावर त्यांना कळले, की हे शब्द इंग्लिशमध्ये आहे तर त्यांना फार समाधान वाटले आणि त्यांचा आत्मविश्वास त्यांच्या चेहऱ्यावर दिसायला लागला.यातून त्यांना असं वाटायला लागलं की आपणही इंग्लिश शब्द वापरतो. तर जेव्हा इतर भाषेमध्ये सुद्धा त्यांना बोलायची संधी मिळाली. त्यांनी सर्वात प्रथम मराठीतून काही शब्द बॉडी पार्टला काय म्हणतात हे समजून घेतले. आणि त्यानंतर इंग्लिश मधले बॉडी पार्ट्स त्यांनी संपूर्ण म्हणून दाखवली.

माझ्या वर्गातील जे उपस्थित असणारे सर्व मुले ही बहुभाषिक असूनही आता सध्या इंग्लिश मध्ये पूर्ण बॉडी पार्ट्स इंडिकेट करतात. त्यानंतर बॉडी पार्ट सोबत ते एक असेल, तर this is किंवा these are अनेक असेल तर असे, बोलून वाक्य तयार करतात. ऐवढेच नाहीं तर अशा प्रकारची प्रत्येक मुलं वाक्य बोलताना वर्गात दिसत आहे.

त्यात पिसा पातळीच्या दोन मुली आरुषी राठोड आणि मयुरी खडसे ह्या अतिशय चांगल्या प्रकारे हावभावा सहित वाक्य बोलतात . इतर असर पातळीची मुले प्राथमिक स्तरांमध्ये काही प्रमाणात का होईना, पण भरपूरशी वाक्य बोलायला शिकलेली आहेत.

अशारीतीने वेधकृती घेताना मला खूप वेगवेगळे अनुभव आले. त्यातून विद्यार्थी इंग्लिश शब्द बोलू शकतात आणि पुढे बोलल्यानंतर त्यांना खूप कॉन्फिडन्स त्यांच्या चेहऱ्यावर दिसतो.

दुसरा अनुभव असा,की माझ्या वर्गामध्ये स्पोकन इंग्लिश अंतर्गत सेल्फ इंट्रोडक्शन हा भाग घेतला असतांना, सर्वात आधी माझ्या वर्गातील दोन मुली आरुषी आणि मयुरी यांनी आपल्या स्वतःचे इंट्रोडक्शन देत असताना स्वतःचे नाव, आपल्या आईचे नाव, आणि आपल्या अजून काही दोन-तीन वाक्य बोलून



दाखवली आणि खूप छान प्रकारे एकमेकींसोबत त्या बोलायला लागल्या.तर त्यानंतर त्यांनी स्वतः माय स्कूल नेम ,टिचर नेम असं म्हणून चार ते पाच वाक्य बोलत होत्या. यादरम्यान जेव्हा मुख्याध्यापक वर्ग निरीक्षणास आले आणि त्यांनी वर्ग निरीक्षण केले तेव्हा त्यांना आत येण्याची आतुरता झाली की वर्गात काय चालू आहे आणि मुलींचे कन्व्हर्सेशन बघून त्यांच्याशी स्वतःजवळ घेऊन हाय फाय घेतला . तेव्हा त्या मुलींच्या चेहऱ्यावरचा आनंद हा असे अतिशय वेगळा होता की आपल्याला खूप छान पद्धतीने आपण इंग्लिश मध्ये बोलू लागलो आहो;त्यानंतर दुसऱ्या दिवशीचा त्यांचा कार्यक्रम ठरला. त्यांनी आधी सांगितलं की मॅडम आम्ही आता जे बोललो ते आम्ही माइक मध्ये उद्या नक्की बोलणार.

तर आरुषी आणि मयुरी आत्ता इंग्लीश मध्ये आपले इन्ट्रोडक्शन देऊन हे कन्व्हर्सेशन माईक मध्ये नक्की सांगणार आहे.

तर अशारीतीने भविष्यवेधी शिक्षण विचारांच्या माध्यमातून तयार झालेल्या वेध कृतींमुळे माझ्या मुलांमध्ये आत्मविश्वास वाढविण्यात मला यश मिळाले.



**अमिता नरेन्द्र राउत**
**वसंतराव नाईक प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा पुसागोंडीं,**
**त - काटोल जिल्हा नागपूर.441103**





# असे फिरावे शाळेमध्ये आव्हानाचे लावून अत्तर



सौ.शितल सुरेश मदने

**नमस्कार...**

**मी** २००४ साली नोकरीला सुरुवात केली. सन २०२२ मध्ये क्रीडानिकेतन शाळेत रुजू झाले. शाळेचे वैशिष्ट्य म्हणजे या ठिकाणी खेळासाठी जास्त वेळ द्यावा लागतो. इयत्ता तिसरीच्या विदयार्थ्यांची दिलेल्या आकृतिबंधात बॅटरी टेस्ट होऊन निवड यादी लावली जाते व त्या विदयार्थ्यांची खेळाची आवड, शारीरिक क्षमता, लवचिकता पाहून शाळेत प्रवेश दिला जातो .

खेळाला जास्त वेळ द्यावा लागत असल्या कारणाने शालेय वेळेतील अध्यापनासाठी वेळ कमी पडतो. परंतू त्यातूनही शाळेतील शिक्षक मग नवनवीन पद्धती वापरून मिळालेल्या वेळेत अध्यापन जास्तीत जास्त परिणामकारकतेने कसे होईल? यासाठी प्रयत्न करत असतात. मैदानावर जास्त वेळ खेळलेली मुले वर्गात आली की,अध्यापनासाठी नेहमी उत्साही पहायला मिळतात. कोणतीही नवीन गोष्ट शिकविली की मुलांना लगेच समजण्यास मदत होते.शिवाय नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत भविष्यवेधी 'शिक्षणाच्या उद्देशाने झालेले 'अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन' या प्रशिक्षणाच्या माध्यमातून अनेक नवनवीन संकल्पना स्पष्ट झाल्या आहेत. त्याचे अनेक फायदे वर्गामध्ये दिसू लागले आहेत.



Group Learning Activity

'मूल स्वतः शिकू शकते' यानुसार मिळालेल्या कमी वेळेचे मी योग्य नियोजन करून मुलांना रोज एक आव्हान देऊ लागले. जी मुले दिलेल्या वेळेत अचूकतेने आव्हान पूर्ण करतील त्यांचा माझ्याबरोबर सेल्फी घेऊ लागले. selfie with success खरंच यशस्वी होऊ लागले.आपल्या शिक्षकांबरोबर आपण सेल्फीत येऊ यासाठी मुले प्रयत्न करू लागली. दिलेले आव्हान पूर्ण करू लागली. चौथीचा वर्ग असल्याकारणाने मुले बऱ्याचवेळा स्वयंअध्ययन करण्यात उत्सूक असायची. घरी गेल्यावर आई वडीलांचा मोबाईल फक्त युट्यूब अथवा गेम खेळण्या- साठी न घेता आज वर्गात दिलेले आव्हान पूर्ण करण्यासाठी घेऊ लागली. अनेकदा कितीतरी गोष्टींची माहिती गुगलवर सर्च करून लिहून आणू लागली.एकदा लिहीणे म्हणजे दोनदा वाचणे याप्रमाणे केलेला अभ्यास मुलांच्या चांगला लक्षात राहू लागला. कृतीतून शिक्षण यामूळे मुलांच्या अध्ययनातील निरसता दूर होऊन नवचैतन्य निर्माण होऊ लागले आहे.

अभ्यासाचा- लिखाणाचा कंटाळा करणारी मुले स्वयंप्रेरणेने शिकू लागली आहेत.

- अमावस्या- पौर्णिमा म्हणजे काय शिकवलं की मूल रोज रात्री आकाशात चंद्राचं निरीक्षण करू लागली व दुस-या दिवशी शाळेत आल्यावर चंद्राच्या कलांविषयी चर्चा करू लागली.

- सूर्योदय -सूर्यास्तही रोजच्या रोज निरीक्षण करून त्याची वेळ किती आहे ते नोंद ठेऊ लागली.

- स्वतः कॅलेंडर वरील दिलेल्या अनेक प्रश्नांचे आव्हान निरीक्षणाने विचाराने पूर्ण करू लागली.

- मापन परिमाणे, परिमिती, क्षेत्र-फळ यांसारख्या गणितीय संकल्पता स्वकृतीतून, प्रत्यक्ष मोजून त्यांची एकके समजून घेऊ लागली. स्वतः विज्ञानाचे छोटे छोटे प्रयोग करून नवीन संकल्पना, वैज्ञानिक संज्ञा समजून घेऊ लागली.



Selfie With Success



विषय मित्राच्या साह्याने शिकतांना विद्यार्थी

- प्रत्यक्ष आनंदी बाजार उपक्रमाध्ये मध्ये सहभागी होऊन नफा तोट्याचे व्यवहारज्ञान आत्मसात करून घेतले.

अनेकदा मी स्वतः विदयार्थ्यांना मुद्दाम सांगायचे की, पाठात आलेला हा शब्द काय आहे किंवा याची मला माहिती काहीच नाही .तुम्ही ती घरी कोणालाही विचारून अथवा गुगल सर्च करून मिळवा व उदया मला येवून सांगा तर बरीच मुले दिलेल्या नवीन शब्दांची माहिती आवडीने मिळवून शिक्षकांना, मित्र मैत्रिणींना ती सांगू लागली आहेत.

'अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थान' या प्रशिक्षणाच्या माध्यमातून अनेक नवनवीन संकल्पना स्पष्ट झाल्या आहेत, त्यांचे अनमोल असे फायदे शाळेमध्ये दिसत आहेत. वर्गात खूप आनंददायी आणि खेळीमेळीचे वातावरण पहायला मिळत आहे. मुलांच्या अध्ययनातील निरसता दूर होऊन, नवचैतन्य निर्माण झाले आहे. अभ्यासाचा कंटाळा येतो; असे म्हणणारी आवडीने अभ्यास करू लागली आहेत.

भविष्यवेधी शिक्षणात महत्वाचे म्हणजे मुलांमध्ये आत्मविश्वास वाढत चालला आहे. आता रडणा-या, गैरहजर राहणाऱ्या मुलांचे प्रमाण कमी होऊ लागले आहे. आणि विशेष म्हणजे अध्ययन छान होत आहे.आनंददायक वातावरणात अध्ययन- अध्यापन होण्यास मदत होत आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात एक गोष्ट समजली की आपली भूमिका फक्त शिकवणे ही नसून आपल्याला या बालकांचे मित्र बनून त्यांचे मार्गदर्शक व्हायचे आहे.सुलभक व्हायचे आहे.

**सौ.शितल सुरेश मदने**
**भारतरत्न सचिन रमेश तेंडुलकर क्रीडानिकेतन**
**८३ बी,हडपसर, पुणे-२८.**
**शिक्षण विभाग पुणे महानरपालिका**

# वेध पब्लिकेशन




'वेध' प्रकाशित पुस्तके अत्यंत अल्प दारात उपलब्ध




वाचनीय, विचारला दिशा देणारे, मुलांची शिकण्याची गती वाढविण्याच्या उद्देश्याने उपयुक्त पुस्तके आजच खरेदी करा.

पुस्तके खरेदी करण्यासाठी येथे क्लिक करा.

https://vedhfuturisticeducation.myinstamojo.com/




COMING SOON



# वाचक अभिप्राय





## होय, हे शक्य आहे...!

### अनुभव भविष्यवेधी शिक्षणाचे

पुस्तक वाचन करत असताना प्रत्येक अनुभवातील कृतींवर चिंतन केल्यास काय परिणाम मूल शिकण्याच्या प्रक्रियेत होतो हे अनुभवास येत आहे. पुस्तकात सरांनी त्यांना आलेले अनुभव लेखन केले आहे ते वाचत असताना आपणही त्या भावविश्वात रंगून जातोय आपल्याला येणारे अनुभवही असेच आहेत याचा प्रत्यय आला.

निकाळजे सरांनी शिक्षकाने त्याला येणारा प्रत्येक अनुभव हा डोळसपणे,संवेदनशीलतेने,सतत जागृत राहून, संयमाने कसा घ्यावा. हे खूप महत्वाचं वाटलं. प्रत्येक मूल वेगळं असत आणि त्याला जे आवडते, त्याला तेच पुन्हा पुन्हा आणि आवडीने करावे वाटते. हे underline वाक्य आहे आणि त्याचा प्रत्यय येत आहे. ज्ञानरचनावादी पद्धतीचा वापर. प्रत्येक येणाऱ्या अनुभवावर चिंतन करणे.

जेव्हा वर्गात शिकण्याची प्रक्रिया सुरु असते, तेव्हा ती फक्त एक कृती नसून वर्गातील अनेक सर्जनशील विचारांची एकत्रितपणे चाललेली गुंफण असते. याचाही अनुभव वर्गात येत आहे. प्रत्येक अनुभवावर चिंतन करावे हे खूप महत्वाचे वाटले. पुन्हा एकदा Negativity कडून Positivity कडे वाटचाल सुरु झाली आणि माझ्यातील सजग सुलभक जागा झाला. DISCIPLINE, PUNCTUALITY आणि CONSTISTENCY महत्वाची आहे.

" खरंच होय, हे शक्य आहे !"

AMAZING EXPERIENCES.

खूप खूप मन:पूर्वक धन्यवाद निकाळजे सर

सगळ्यात शेवटी वेध पुणे जिल्हा चे श्री. नितीन मेमाणे सर, सौ.मनीषा कुऱ्हाडे मॅडम यांचे मन:पूर्वक धन्यवाद!

THANKS TO ALL वेध परिवार!



श्रीम. स्वाती खुडे उनवणे
जि. प.प्राथ.शाळा,
गडाचीवाडी (खोडद)
ता. जुन्नर, जि.पुणे.

पुस्तकांसाठी संपर्क
9890018388



# निसर्गाची ओढ, त्याला पर्यावरण पूरक उपक्रमाची जोड



सौ. विदया सुदर्शन माळी

**सर्व विद्यार्थी, शिक्षक, पालक बंधु आणि भगिनींना नमस्कार!**

मी, सौ विद्या सुदर्शन माळी. आमच्या MVM रामचंद्र राठी मराठी माध्यमिक विद्यालय पुणे, येथे आलेले अनुभव तुमच्यासोबत शेअर करत आहे.

भविष्यवेधी शिक्षणाच्या 6 पायऱ्या आणि त्यांची अंमलबजावणी करताना मुलांमध्ये जाणवलेले बदल मी या लेखात मांडणार आहे.

ग्रामीण भागाप्रमाणेच शहरी भागात देखील मुलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देताना त्यांच्यामध्ये शैक्षणिक बदलाची गरज रुजवणे आवश्यक ठरते.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थी सक्षम व्हावेत, यासाठी भविष्यवेधी शिक्षण आवश्यक आहे.

तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण देताना इयत्ता 8 वी च्या मुलांनी कुतूहलाने GEOGEBRA app चा वापर करू भौमितीय रचना केल्या. EXCELL वर गणितातील सांख्यकीचा डेटा तयार करू त्यावरील सूत्रे वापरली. सध्या ट्रेंड मध्ये असलेल्या AI in Excel, AI in data science याबद्दल चर्चा केली. माझ्या इयत्ता 10 वी च्या अनुष्का होडे या विद्यार्थिनीने आवर्जून data science कडे जाण्याचा मार्ग अकरावी साठी निवडला.

आता शिक्षकांसोबतच मुलेही तंत्रस्नेही बनू लागली आहेत.

आमच्या शाळेमध्ये पर्यावरण शिक्षण आणि शाश्वत विकासाचे तत्त्वज्ञान शिकताना 'स्वच्छ वर्ग स्पर्धा' घेतली जाते यातून मधल्या सुट्टीतील अन्नपदार्थांची नासाडी यातून दूर होत आहे. कौशल्याधारित आणि अनुभवाधारित शिक्षणाची सुरुवात परसबागेत काम करून मुलांनी बीज, रोपाचे तंत्र शिकून केले. पर्यावरणातील STEM प्रकल्प करताना इको क्लब मधील मुलांनी गणितातील मोजमाप आणि एककाचे रूपांतर वाफे तयार करताना अभ्यासले. वीज पेपर, पाणी वापर, घनकचरा व्यवस्थापन करणे यावर दैनंदिन निरीक्षण तक्ता तयार



केला. हाच data म्हणून गणितात वापर करण्याचे मुलांनी ठरविले आहे. STEM उपक्रम फक्त रोबोटिक्स एवढेच मर्यादित नाहीत, हे मुलांनी दाखवून दिले. खत निर्मिती करताना जैविक विघटनआणि सूक्ष्मजीवांचे कार्य समजून घेताना 8 वी ची मुले स्वतःच्या नखाची, शरीराची आणि परिसराची स्वच्छता ही शिकली.



आज मुले मी न सांगता या रोपांची काळजी घेतात, झाडांमध्ये झालेले बदल निरिक्षणातून अभ्यासतात आणि त्यावर चर्चा करतात. बागेतला जिवंत शंख कुतूहलाने आणून दाखवतात.

स्वतः शिकण्याच्या या प्रक्रियेत अनुभवाधारित शिक्षण घेताना मुलांनी भूगोलाच्या खडकांचे प्रकार, त्यांचा आढळ, त्यांची रचना स्वतः गोळा केलेल्या दगडाच्या आधारे अभ्यासली.

6 वी, 7 वी ची मुले रोजी हे दगड गोळा करू आणत होते आणि मग आम्ही त्याचे प्रदर्शन माझ्या सहकारी विज्ञान शिक्षिका कु. धनश्री कस्पटे आणि भूगोल शिक्षिका सौ. मृणालिनी सप्रे यांच्या मदतीने भरवले. त्यातूनच जिविधाता या पर्यावरण पूरक काम करणाऱ्या संस्थेने आयोजित 'भारतभूमीची निर्मिती' या प्रदर्शनासाठी आम्ही वर्णी लावली आणि जगभरातील खडकांचे प्रकार उत्सुकतेने पाहिले.




21 व्या शतकातील कौशल्ये मुलांमध्ये रुजावीत यासाठी केलेले हे प्रयत्न परीणाम देत आहेत.

वनराई या संस्थेच्या मार्फत आम्ही वरील पर्यावरणपूरक प्रकल्प राबवितो, त्यांचे अनुभवाधारित पर्यावरण रक्षणाचे बीज आम्ही आमच्या मुलांमध्ये पेरतो आहोत. वनराई चे श्री. बसवंत सर आमच्या मुलांना झाडांची, निसर्गाची ओढ किती गरजेची आहे हे पटवून देतात.

9 वी च्या प्रणिता बागुले या माझ्या विद्यार्थिनीने निसर्गावर अतिशय सुंदर कविता लिहिली आहे.5 ते 9 वी च्या मुलांनी सुंदर चित्रे रंगविली आहेत, यातूनच निसर्गाबद्दल आपुलकी आणि जवळीक साधण्यास मदत होते.व्याघ्र दिनानिमित्त मुलांनी वर्तमानपत्रातील वाघावरील बातम्या वाचून त्यावर माझ्याबरोबर चर्चा केली.

प्रत्येक विद्यार्थ्यांच्या गरजा आणि क्षमतेनुसार अध्ययन प्रक्रियेची रचना करताना इयत्ता 9 वी चे मुले टाकाऊ बॉक्स पासून तयार केलेला पूर्णांक संख्याचा खेळ खेळताना धन आणि ऋण संख्यावरील क्रिया शिकतात.

प्रत्येक गोष्टीचा अनुभव घेत अध्ययन प्रक्रिया राबविताना सुलभक म्हणून काम करणे अत्यंत गरजेचे आहे, यावेळी गटातून अध्ययन जलद झाल्याची नोंद सोनाक्षी देवकर या माझ्या विद्यार्थिनीने केली.
learning intervention ची ही परीणामकारकता मनाला आनंद आणि समाधान देऊन जाते.

भविष्यवेधी शिक्षण हे एकात्मिक दृष्टिकोनावर आधारित आहे, जिथे विद्यार्थ्यांना ज्ञान, कौशल्ये व मूल्यांचा समतोल साधता येतो. वरील पायऱ्यांच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे आपले शिक्षणतंत्र जागतिक स्तरावर पोहोचू शकते. वेध समूहात कार्यक्रम करताना सहभागी शिक्षकांचे अनुभव आणि मार्गदर्शन मिळाल्यामुळे विचारांची देवाणघेवाण देखील होते.

शिक्षक, पालक आणि शासनाने एकत्र येऊन हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी योगदान दिल्यास, शिक्षणव्यवस्थेचा चेहरामोहरा बदलू शकतो आणि आपल्या शाळेला आणि मुलांना आंतरराष्ट्रीय स्तरावर आणू शकतो याची खात्री आता वाटते आहे. त्यासाठी वेध परीवाराचे मनःपूर्वक धन्यवाद !!





**सौ. विदया सुदर्शन माळी**
**MVM रामचंद्र राठी मराठी माध्यमिक विद्यालय, पुणे.**





FUTURE VIDYA
LEARNING BEYOND LIMITS

**फ्युचर विद्या - लर्निंग बियॉन्ड लिमिट्स** ही एक संस्था आहे जी शिक्षण आणि प्रशिक्षण क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडवून आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. आमचे ध्येय विद्यार्थ्यांमध्ये नऊ बुद्धिमत्ता विकसित करण्यासोबतच सर्जनशीलता, नाविन्य आणि तांत्रिक कौशल्ये वाढवणे आहे, ज्यामुळे त्यांना भविष्यातील आव्हानांना आत्मविश्वासाने तोंड देण्यास सक्षम बनवले जाईल.

आमचा प्रवास शिक्षणाच्या पारंपारिक दृष्टिकोनात बदल करण्याच्या दृष्टिकोनातून सुरू झाला. विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांना एकत्र आणणाऱ्या नाविन्यपूर्ण कार्यक्रमांद्वारे आम्ही शिक्षण अधिक प्रभावी, सुलभ आणि संबंधित बनवत आहोत.

विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोन: प्रत्येक विद्यार्थ्याच्या वैयक्तिक विकासावर लक्ष केंद्रित करणे.
नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब: शिक्षणात ऑगमेंटेड रिअॅलिटी (एआर), व्हर्च्युअल रिअॅलिटी (व्हीआर) आणि आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) यांचा समावेश करणे.
समुपदेशन आणि मार्गदर्शन: केवळ शिक्षणच नाही तर भविष्यासाठी एक स्पष्ट दिशा देखील प्रदान करणे.
समावेशकता: प्रत्येकासाठी शैक्षणिक संधी उपलब्ध आहेत याची खात्री करणे.

फ्युचर विद्या - लर्निंग बियॉन्ड लिमिट्स मधील अध्यापन पद्धती पारंपारिक शिक्षणाच्या पलीकडे जाते, विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास, नेतृत्व आणि व्यावसायिक क्षमतांना प्रोत्साहन देणारा समग्र दृष्टिकोन स्वीकारते. आम्ही तंत्रज्ञान, अनुभव आणि उद्योजकता यांचे मिश्रण म्हणून शिक्षणाचे भविष्य पाहतो.

आम्ही शिक्षकांसाठी व्यावसायिक शिक्षण समुदाय (पीएलसी) असलेल्या वेध परिवार, भारत यांच्यासोबत ज्ञान भागीदारी स्थापित केली आहे. हे सहकार्य वेध परिवार, भारत द्वारे चालवल्या जाणाऱ्या प्रभावी शैक्षणिक कार्याचे प्रदर्शन करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करते. त्या बदल्यात, आमच्या संस्थेला त्यांच्या अनुभवी नेटवर्कचा फायदा होतो, ज्यामुळे विविध शैक्षणिक प्रशिक्षण कार्यक्रमांचा विकास शक्य होतो.

## आमचे कोर्सेस :-

- SQ3R
- प्रगत शैक्षणिक समुपदेशन
- Johari Window
- शुभमंगल पूर्वी सावधान
- metacognition
- Online Platform उपयोग

## चाचण्या

- प्रगत शैक्षणिक समुपदेशन चाचणी
- २१ व्या शतकातील अध्ययन कौशल्य चाचणी
- FISA पात्रता चाचणी

VISIT OUR WEBSITE

www.futurvidya.com

# LEARNING Habits




Master your Learning Habits

"Learning is the key to growth and achievement.
The Learning Habit Assessment Test will help you understand your study patterns and identify areas to improve your learning strategies.
Discover how to unlock your full potential and excel in every aspect of your life.
Take the first step toward mastering the art of learning.

Start the assessment today!

Marathi – https://surl.li/nsxdcz

English- https://futurevidya.com/learning-habits-assessment-test/

For more information visit now 👇

www.futurevidya.com

# काव्य संग्रह

## शिकूया नवी कौशल्ये

शिकूया नवी कौशल्ये, उंच भरारी घेऊया,
२१ व्या शतकात पुढे, पुढे वाटचाल करूया।
क्रिटिकल थिंकिंग ने विचार करू, प्रश्न नविन विचारू,
चुकीच्या गोष्टींना नाही, सत्याच्या मागे धावू।
सहकार्य आणि संवाद आपले हत्यार असे,
एकत्र येऊन जग जिंकू, मैत्रीचे सूर जसे।



डिजिटल साक्षरता हवी, तंत्रज्ञानाची साथ,
शिकून घेऊ नव्या दिशा, यश येईल हातात।
वेळेचे व्यवस्थापन करू, नियोजन ठेवू चांगले,
सपने आपल्या साकार होतील, मेहनतीने रंगले।



स्व-नियंत्रण आणि जिद्द ने, कधीही न डगमगू,
स्वत:वर ठेवू विश्वास, नवी स्वप्ने साकारू।
नवीन जगाच्या या वाटेवर, आत्मविश्वास हवा,
कौशल्ये शिकत मोठे होऊ, प्रगतीचा दिप जळवा! 🚀✨

## छोटे छोटे धडे शिकूया

📚 शिकू नवे गाणे, शिकू नवी गोष्ट,
ज्ञानाच्या या दुनियेत, करूया मजेची यात्रा मोठी! 🎒
📝 अभ्यास करू हसत खेळत, मन लावून रोज,
नवे धडे, नवी गोष्टी, साठवू आपल्या ओंजळीत ओज! 🌟
⏳ वेळेचे आपण नियोजन करू, थोडे थोडे शिकू,
नवीन गोष्टी समजून घेऊन, पुढे पुढे जाऊ! 🚀
💡 प्रश्न विचारू, उत्तर शोधू, बुद्धीला देऊ धार,
अभ्यासाच्या या वाटेवर, उजळू ज्ञानसागर! 🌊
💖 शिकणे म्हणजे आनंद आहे, रडायचे काही नाही,
मजा करत शिकत गेलो, तर यश दूर नाही! 🏆✨



वेध परिवाराकडून

तसेच

FutureVidya.com

च्या वतीने

# धन्यवाद !

